
ISSN No.0973-2845

समाज प्रबोधन पत्रिका


वर्ष ६३ । अंक २४८ ।
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५



# समाज प्रबोधन पत्रिका

पुस्तक परीक्षण

**संग्राम गोपीनाथ थोरात**




# चरित्र सत्यशोधक लोकशाहिराचे

मराठी साहित्यात शाहिरी साहित्यधारेचा प्रारंभ शिवकाळापूर्वीपासून आहे. या साहित्याला लोकसाहित्याची पार्श्वभूमी आहे. कारण लोकानुसारी, लोकाश्रयी, लोकानुभवी असा या साहित्याचा सामाजिक पिंड आहे. मराठी साहित्याची ही परंपरा महाराष्ट्रात विशेषतः पेशवेकाळात पुणे - नगर जिल्ह्यात आणि नंतर मराठ्यांची दुसरी राजधानी सातारा या जिल्ह्यात मोठ्या जोमाने आणि गुणवत्तेने जोपासली गेलेली दिसते. सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येचा काळ आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा ३/४ तपांचा काळ शाहीर साबळे व शाहीर पुंडलिक फरांदे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्वाने गाजविला.

साताऱ्याचे ज्येष्ठ पत्रकार जयवंत गुजर यांनी या शाहिराचे चरित्र ('लोकशाहीर फरांदे एक वादळ') लिहिले आहे. एकूण सोळा प्रकरणांमध्ये हे चरित्र विभागलेले आहे. तसेच त्यांचे दहा पोवाडे व अठ्ठावीस लोकगीते यांचाही ग्रंथात समावेश आहे. सातारा जिल्ह्यातील तांबव्याचे देगांव येथे आजोळी पुंडलिक फरांदे यांचा जन्म १५ ऑगस्ट, १९२३ रोजी झाला. साताऱ्याच्या ज्या कामाठीपुरा परिसरात पुंडलिक फरांदे घडले, त्याच परिसरात लेखकही वाढल्याने त्यांचे बालपणापासून मित्रत्वाचे संबंध होते. त्यामुळेच त्यांच्या कार्याची इत्यंभूत माहिती त्यांना आहे. लेखकाने यापूर्वी शाहिरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यासाठी इ.स. १९६९

सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग
किसान वीर महाविद्यालय, वाई
sangramthorat750@gmail.com
९६०४०४६०८४

व १९९२ अशा दोन स्मरणिका संपादित केल्या आहेत. सदर ग्रंथ म्हणजे एका मित्राने आपल्या कलावंत मित्राचे केलेले हे स्मरण आहे.

म.फुले हे आपल्या भारतीय प्रबोधन चळवळीचे एक महत्त्वाचे स्तंभ आहेत. त्यांचे लेखन, आचार, विचारच नव्हे तर त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्वच प्रेरणादायी होते. आजच्या सर्वच क्षेत्रांवर त्यांच्या विचारांचा ठसा दिसून येतो. त्यांच्या विचारांतून स्फूर्ती-प्रेरणा घेणारे विचारवंत जसे भेटतात तसे कलावंत, शाहीर, साहित्यिकही भेटतात. पुंडलिक फरांदे हे त्यातीलच एक नाव आहे. म. फुल्यांचा सत्यशोधकी विचार या शाहिराने शाहिरी कलेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या रोमारोमांत भिनवला. त्यामुळेच प्रस्तावनेत प्रकाश फरांदे म्हणतात, '......त्या लोकशाहिराची जीवनगाथा हीच सत्यशोधकांची भगवद्गीता ठरू शकेल.' लेखक सत्यशोधकांच्या यादीमध्ये गौतम बुद्ध, संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, छ.शिवाजी महाराज, छ. शाहू महाराज, साताऱ्याचे छ. प्रतापसिंह महाराज, बसवेश्वर, कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव विचारे, धनजीशा कूपर यांचा समावेश करतात व संत तुकारामांबद्दल म्हणतात, 'तुकाराम जर पंढरपूरला गेले नसते तर महात्मा फुले यांच्या अगोदर तेच सत्यशोधक झाले असते. कारण त्यांनीच एकेठिकाणी म्हटलंय, 'तुका पंढरीसी गेला। पुन्हा नाही जन्मा नाही आला' (पृ.४). ही नाममाला पाहिल्यावर म. फुले ते पुंडलिक फरांदे असा सत्यशोधकी विचारांचा पट उलगडत जातो. भले या संत-महंतांचा मार्ग वेगवेगळा असेल; पण 'सत्यशोधन' हा या प्रत्येकाच्या कार्याचा गाभा आहे. असे लेखकाला वाटते व त्यांच्या विचारांना आपण अंशतःही समजू शकलो नाही, याची खंतही लेखकाला आहे. लेखकाची कैफियत मांडताना म्हणतात, 'फरांदे एक वादळ हा ग्रंथ म्हणजे त्यांचे साचेबंद चाकोरीतील आयुष्यपट नाही तर त्या एका सत्यशोधकाने आयुष्यभर जे अनुभवले, सोसले, त्यांना जे बोचले आणि ते त्यांनी निसर्ग खेड्यातील माणूस आणि गिरणी कामगार यांच्या दुःखाची नाळ मराठीमध्ये नारायण सुर्वे व लोकशाहीर फरांदे यांच्याशी निगडित असल्याने दोघांच्याही बोलीभाषेमुळे काव्यात देखील आपसूक नाते जडले' (पृ.३०).

पुंडलिक फरांदे हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुमारे ५० वर्षे लेखन व गायन करणारे कलावंत आहेत. त्यांनी १९४१ साली स्थापन केलेल्या 'आपले कलापथक'चा उद्देश 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हा होता. समाजात असणारे अज्ञान, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी दूर व्हाव्यात व समाज सजग, सुजाण व समर्थ व्हावा या हेतूने शाहिरांचे कार्य चालू होते. समाजात समता, बंधुता नांदावी. तसेच सामान्य जनतेने आपली ताकद ओळखून समाजपरिवर्तनासाठी तयार व्हावे यासाठी शाहिरांनी जोशपूर्ण कार्यक्रम करून समाजाला जागृत केले. समाजात उठाव घडवून आणला. जनतेतील देशप्रेम जागृत केले. या कार्यामुळेच ते लोकशिक्षक, समाजशिक्षक ठरतात. भारत धर्माजी बडेकर हा शाहिरांच्या पार्टीत हार्मोनियम वाजवायचा त्याच्या बायकोला शिकवून शाहिरांनी नगरपालिकेच्या दवाखान्यात क्लार्क म्हणून नोकरीस लावले. त्यांनी भटक्या जातीतील वैदू, कोल्हाटी, बांगडी जोशी यांना समाजप्रवाहात आणले. उदाहरणादाखल यल्लाप्पा तायप्पा वैदू याचे नाव घेता येईल. त्याला पदवीधर करून रयत शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक बनविण्यात शाहिरांचा मोठा वाटा आहे. श्रीमती इंदू यल्लाप्पा वैदू कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात, ''आमच्या समाजाला शाहिरांनी माणसांत आणले. त्यांनी केवळ माझ्या पतींना नव्हे तर रमेश वैदू, उत्तम शिर्के, शिवाजी वरगटे, गोविंद शिर्के यांना पण घडविले. माझ्या पतीचे सारे शिक्षण शाहिरांनी केले. बी. ए. ला कमी मार्क पडल्याने बी. एड्.ला प्रवेश मिळत नव्हता. रयतमध्ये जाऊन प्रा. इस्माईल मुल्ला यांच्याकडे जी बाजू मांडली त्यामध्ये खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांचे दर्शन घडले. माझे मालक बी. एड्. झाले. शिक्षक झाले. त्यांच्या पायात त्राण आले. समाजासाठी त्यांनी काम केले हे सारे शाहिरांमुळे घडले. लोकशाहीर फरांदे आमच्या समाजाचे खरंच गाडगेबाबा आहेत!'' (पृ.५६). हे यल्लाप्पा वैदू पुढे मुख्याध्यापकही झाले, असे सांगून लेखक म्हणतात, हा सारा परिवर्तनाचा इतिहास ते जर हयात असते तर त्यांनी निश्चित लिहिला

असता. अशा अनेक व्यक्ती शाहिरांनी घडविल्या आहेत. या यल्लाप्पाच्या मदतीने त्यांनी वैदू समाजात सामुदायिक विवाह समारंभ आयोजित केले. त्या समाजातील मुली विकण्याची अनिष्ट प्रथा बंद केली. वैदू वस्तीत बालवाडी चालू केली. तसेच शोषणमुक्त समाजव्यवस्थेसाठी शेतकऱ्यांची दुर्दशा संपली पाहिजे. लाखांचा पोशिंदा स्वतःच्या पायावर उभा राहिला पाहिजे. भारतीय जीवनपद्धतीचा प्राण असलेला कृषी व्यवसाय तंदुरूस्त झाला पाहिजे. त्यासाठी शिक्षण हवे यासाठी जिल्ह्यातील लोकल बोर्डच्या शाळेत शिक्षक बहुजन समाजातील हवा तोच आपल्या मुलांना योग्य ते शिक्षण देऊ शकेल ही भूमिका घेऊन त्यांनी ती सातारा जिल्हा स्कूल बोर्डामध्ये प्रभावीपणे राबवली. अशी शिक्षणाविषयीची शाहिरांची तळमळ होती. म्हणूनच त्यांना लोकशिक्षक म्हटले तर वावगे ठरणार नाही. लेखकाला तर ते शाहिरांचे शाहीरही वाटतात. शाहिरांनी अनेक शाहीर घडविले आहेत. त्यांनी अर्धशतकाहून अधिक काळ सत्यशोधकांची पताका खांद्यावर मिरवित उभा महाराष्ट्र पिंजून काढला होता. शाहिरांच्या या तळमळीतून प्रेरणा घेऊन शाहिरांचे वारस म्हणून शाहीर प्रभाकर आसनगावकर (मुंबई), शाहीर सूर्यकांत वावळ, शाहीर शंकर जाधव, शाहीर नारायण जाधव हे सर्वजण मुंबईत, शाहीर कृष्णराव क्षीरसागर (सातारा), शाहीर तोडकर (कोरेगाव), शाहीर यशवंत पवार (रेठरे, सांगली), शाहीर नजिर शेख (पुणे), शाहीर जयवंत घाडगे (कराड) शाहिरी कलेची सेवा करीत आहेत. शाहीर फरांदे आयुष्यभर महाराष्ट्रातील लोककलेसाठी सर्व शाहीर व लोककलावंतांना मानाने जगता यावे यासाठी प्रयत्नशील होते. अशाप्रकारे शाहिरांनी पुढच्या पिढीत कला दिलेली आहे. त्यांच्या घरातील एक मुलगा चांगला ढोलकी वादक व कुटुंबातील लहान मुले वाद्यवृंद म्हणून काम करतात. हे सर्व त्यांचे वाङ्मयीन वारस आहेत. लेखक म्हणतात, 'शाहीर फरांदे यांचे समकालीन जे शाहीर होते त्यातील काही लाल बावटयात अडकले होते तर काही स्वातंत्र्यचळवळीत गुरफटले अशा वेळी त्यापैकी कुणाशीही फारशी जवळीक न ठेवता पुंडलिक फरांदे यांनी गिरणी कामगार म्हणून जी मंडळी मुंबईत पोटापाण्याची खळगी भरण्याकरिता आली होती. त्यातील ज्यांना गाण्याचे अंग आहे असे शाहीर हुडकून काढून त्यांच्यावर खऱ्या अर्थाने शाहिरी संस्कार केले. डिलाईडरोडची व्यंकू कामाठी चाळ हेच या नवीन शाहिरांचे मुक्त विद्यापीठ ठरले आणि इथं त्यांनी शाहीर शंकर बापू जाधव, शाहीर ग्यानबा भिलारे, शाहीर बाबूराव सराटे, शाहीर शंकरराव भाटे, शाहीर विष्णू गिलबिले, शाहीर विष्णू चिखलीकर, शाहीर यशवंत पवार, शाहीर नारायण जाधव, शाहीर नारायण काशिद, शाहीर प्रभाकर गायकवाड, शाहीर रमजान बागणीकर, शाहीर उत्तम भिंगारदिवे, शाहीर दत्तात्रय ज्ञानदेव तोडकर असे अनेकजण त्यांच्या संपर्कात आल्यावर त्यांच्यावर शाहिरी संस्कार केले' (पृ. १४७). सामाजिक बांधिलकी जपून या शाहिरानी कार्य केले आहे. समाजाची उन्नती व्हावी, शेतकरी व कामकरी यांचा विकास व्हावा हाच त्यांचा मुख्य हेतू होता. या तळमळीतूनच त्यांनी समाजाला 'लोकशिक्षण' दिले. शाहिरांना पाठविलेल्या पत्रात Rabindranath Tagore, Centenary Committee तील महाराष्ट्र राज्याचे सचिव लिहितात, "This is to state that I have been knowing Shahir Pharande of the "Aple Kalapathak' for a very long time. He is very popular particularly among the working classes for his folk music. He has devoted himself for the course of education and through his program he has been carrying on the mission with great sacrifice. He and his troupe deserve all encouragement. His contribution in the field of prohibition and Social Education is commendable." (सदर संदर्भ शाहिरांना आलेल्या पत्रातून घेतलेला आहे.)

सत्यशोधकी शाहिरी हे जसे शाहीर पुंडलिक फरांदे यांचे वेगळेपण आहे. तसेच ते भारतीय काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत प्रचारक होते. स्वातंत्र्योत्तर काळात फोफावलेल्या कलापथकांनी अनेक राजकीय पक्षांचा आश्रय घेतला. तसेच शाहिरांचे 'आपले कलापथक' काँग्रेस पक्षाच्या प्रचाराचे कार्य करीत असे. या पाठीमागे शाहिरांचा राजकीय वा आर्थिक हेतू नसून निःस्वार्थ भावना, श्रद्धा व निष्ठा होती. ज्या त्यागाच्या भावनेतून म. गांधी,

नेहरू, लालबहादूर शास्त्री यांनी काँग्रेस कमिटी स्थापन केली होती. तीच भावना शाहिरांच्या अंतःकरणात होती. त्यातून बिदागी मिळावी अशी त्यांची इच्छा नव्हती तर पक्ष वाढावा व देशातील राष्ट्रपुरुषांचे विचार लोकांना समजावेत हा शुद्ध हेतू घेऊन शाहीर प्रचार करीत असत. त्यासाठी प्रचारगीते लिहून ते सादरीकरण करीत असत. लेखकाने सदर ग्रंथामध्ये काँग्रेस व शाहीर असे स्वतंत्र प्रकरणच लिहिले आहे. शाहीर काँग्रेस पक्षाच्या प्रचाराचे काम करीत असल्याने महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाणांपासून ते देशभक्त आबासाहेब वीर व सर्वच पुढारी शाहिरांचे निकटचे मित्र होते. त्यात वसंतराव नाईक, बाळासाहेब देसाई, वसंतराव पाटील, वि. स. पागे, राजाराम पाटील, यशवंतराव मोहिते, नरेंद्र तिडके, मधुसुदन वैराळे, बा. म. भारस्कर, दादासाहेब जगताप, भि. जि. खताळ, सुंदरराव सोळंके, पंढरीनाथ पाटील, प्रतापराव भोसले अशा अनेकांची नावे घेता येतील. पण यांच्या ओळखीचा गैरफायदा शाहिरांनी कधीही घेतला नाही. शाहिरांच्या आठवणी सांगताना प्रतापराव भोसले (भाऊ) म्हणाले होते,''शाहिरांनी शेवटपर्यंत पक्षावरील निष्ठा सोडली नाही. काँग्रेसचा प्रचार सोडून आपल्याकडे येण्याचे नगरच्या एका बड्या नेत्याचे लाखो रुपयांचे प्रलोभन त्यांनी सहजच धुडकावून लावले.'' त्यांच्या या निःस्वार्थी स्वभावामुळेच ते समाजाशी एकरूप झाले. ग. दि. माडगूळकर म्हणतात, ''इतर सारे शाहीर म्हणजे आढीमध्ये पिकवलेले आंबे होते. शाहीर फरांदे हा झाडावर पिकवलेला रसरशीत असा पाडाचा आंबा आहे. तो कृत्रिमपणे पिकवलेला नाही'' (पृ.८४). यात थोडी अतिशयोक्ती असली, तरी शाहिरांचे वेगळेपण यातून सिद्ध होते.

'लोकशाहीर फरांदे एक वादळ' या चरित्रग्रंथातून एका स्वाभिमानी शाहिराचा जीवनपट वाचकांच्या डोळ्यासमोर उभा राहातो. या ग्रंथातून लेखकाने काही प्रश्न मांडले आहेत. तसेच अपेक्षाही व्यक्त केली आहे. उदा. 'मार्क्स तत्त्वज्ञानावर जगात सर्वत्र लिहिले गेले पण त्याहीपेक्षा अधिक कसदार असे श्रममूल्याची दखल घेणारे फुले तत्त्वज्ञान कुणीच डोक्यावर घेतले नाही' (पृ.१८). किंवा 'समाज परिवर्तनाचा जबरदस्त रेटा चालविणाऱ्या गिरणगावात असूनही शाहीर अमर शेख व शाहीर अण्णा भाऊ साठे सत्यशोधक चळवळीत का आले नाहीत? आणि या मंडळींशी अतूट मैत्री ठेवणारे लोकशाहीर फरांदे यांनी आपल्या खांद्यावर लाल बावटा का घेतला नाही?' (पृ.७१) अशा प्रश्नांवर लेखक वाचकांना विचार करायला प्रवृत्त करतात. तर अपेक्षा व्यक्त करताना लेखक म्हणतात, 'जेव्हा खूप अंधारून येते त्यानंतरच प्रकाशाची चाहूल लागते. आता पुन्हा एक नवा कबीर, नवा तुकाराम आपली बंडखोरी घेऊन माणसातील माणूस सांभाळण्यासाठी त्यांच्यातील माणुसकी जपण्यासाठी येईल. नवा अमर शेख, नवा अण्णा भाऊ साठे आणि लोकशाहीर पुंडलिक फरांदे पण गुरुवर्य केशवराव विचारे यांचे बोट धरून निश्चित येतील' (पृ.२३-२४). असा आशावाद व्यक्त करताना शाहिरांना समाजाने उपेक्षित ठेवले हे सांगायला ते विसरत नाहीत, 'समाजाने त्यांना मान दिला पण धन दिले नाही.' लेखकाचे हे वाक्य खूप काही सांगून जाते. असे असले तरी शाहिरांनी आपले समाजकार्य अहर्निश चालू ठेवले. त्यामुळेच लेखकाला त्यांच्याविषयी विश्वास वाटतो. 'आज लोकशाहीर फरांदे यांची सारखी आठवण येते. ते जर असते तर शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली नसती. ते सारे शेतकरी कवी झाले असते आणि पिके बहरली असती' (पृ.३०). हा आशावाद शाहिरांचे मोठेपण सिद्ध करतो.

'लोकशाहीर फरांदे एक वादळ'
लेखक : जयवंत गुजर
प्रकाशक : शाहीर फरांदे प्रतिष्ठान, सातारा
पृष्ठसंख्या : २५६, मूल्य : रु.२५०/-

◆